जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२९/०८/२०२३
## दि.२८/०८/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे १८४/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ३८ वर्षे,रा.खिलारेवाडी,कर्वे रोड,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २३/०८/२०२३ रोजी २१/०५ वा.मधुबाला सोसायटी समोर,देशमुखवाडी,सदाशिव पेठ, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया दुचाकीवरून जात असताना,त्यांचे डावे बाजुने दुचाकीवरुन आलेल्या नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र ५५,०००/- रुपये किंमतीचे जबरी चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, बी.ए.नानेकर ८८५०५०१७७४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे ६०४/२०२३,भादविक ४२०,३४ |
| **फिर्यादी** | एक ज्येष्ठ नागरीक,वय-८२ वर्षे,रा.सेनापती बापट रोड,पुणे |
| **आरोपीत** | १.मेंहदी हसन लालू जाफरी,वय ४० वर्षे,रा.गल्ली नं.०३,रशिद कम्पाउंड,मुंब्रा,ठाणे २.मोसीन सबदरअली इराणी,वय ३० वर्षे,रा.महात्मा गांधी वसाहत,पाटील इस्टेट समोर,शिवाजीनगर, पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०८/२०२३ रोजी १२/३० वा.बँक ऑफ बडोदा या बँकेच्या शेजारील डिपॉजीट मशीन व एटीएम सेंटरच्या बाहेर,सेनापती बापट रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचेकडील ४०,०००/- रूपये रोख रक्कम त्यांचे बँक ऑफ बडोदा या बँकेच्या खात्यामध्ये डिपॉजीट मशिनद्वारे भरण्याकरिता गेले होते. त्याठिकाणी डिपॉजीट मशीन व एटीएम मशीन सेंटरच्या सुरक्षेकरिता नेमलेल्या सुरक्षा रक्षकाकडे पैसे भरण्यास दिले असताना,सदर ठिकाणी यातील दोन इसमांनी अपसात संगनमत करून,फिर्यादी यांनी सुरक्षा रक्षकाकडे भरणा करण्याकरीता दिलेले पैसे सदर इसमांनी त्यांना देवपुजा करण्याकरिता जुनी ५००/- रूपये दराची नोट पाहिजे असल्याचे बहाण्याने सुरक्षा रक्षकाकडुन ४०,०००/- रु घेवुन, त्यामध्ये जुनी ५००/- रुपयेची नोटाचे बहाण्याने पैशाचा बंडल चाळुन,त्यामध्ये जुनी नोट नाही असे सांगुन,सदर पैशाचा बंडल परत सुरक्षा रक्षकाकडे देवुन,नोटाचे बंडल मधील ५,०००/- रुपये हातचलाखीने काढुन घेवुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे, |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, नरेंद्र पाटील ९०११७१९१०० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे १३०/२०२३,भादविक ३७९,५११,३४ |
| **फिर्यादी** | एक ज्येष्ठ नागरीक,वय-७८ वर्षे,रा,कर्वेनगर,पुणे |
| **आरोपीत** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०८/२०२३ रोजी पहाटे ०३/०० ते ०३/३० वा.चे दरम्यान स्नेह सहकारी गृहरचना संस्था (मर्यादीत),हिंगणे,बुद्रुक म्हाडा,कॉम्पेल्क्स,कर्वेनगर,पुणे येथील सोसायटी कार्यालयाच्या मागील बाजुस ए-ईमारतीच्या पाण्याच्या टाकीच्या जवळ असणारे चंदनाचे झाड येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे राहत असलेल्या स्नेह सहकारी गृहरचना संस्था (मर्यादीत),हिंगणे,बुद्रुक म्हाडा,कॉम्पेल्क्स,कर्वेनगर,पुणे या सोसायटीत सेक्रेटरी म्हणुन काम पाहतात. त्यांचे स्नेह सहकारी गृहरचना संस्था सोसायटीचे कार्यालयाच्या मागील बाजुस असलेल्या ए-ईमारतीच्या पाण्याच्या टाकीच्या जवळ असणारे एक चंदनाचे झाड नमुद दोन अनोळखी इसमांनी सोसायटी मध्ये प्रवेश करुन,सोसायटीचे कार्यालयाच्या मागील बाजुस असणारे अंदाजे १०,०००/- रुपये किंचे एक चंदनाचे झाड कापुन चोरीचा करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.फौज. महेश निंबाळकर ९९२३१००१०० |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ४२१/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | असिफ सैय्यद,वय-३७ वर्षे,रा.महंमदवाडी रोड,हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०८/२०२३ रोजी पहाटे ०३/०० ते ०४/०० वा.चे दरम्यान गल्ली नं.०१,गुलामअलीनगर, महंमदवाडी रोड,हडपसर,पुणे येथील फिर्यादी यांचे घराचे शेजारील मोकळया जागेतुन |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे राहते घरा शेजारील गल्ली नं.०१ गुलामअलीनगर येथे मोकळी जागा असुन,त्यामध्ये विविध प्रकारची फळझाडे व काही चंदनाची झाडे आहेत. त्यांचे घराचे शेजारील असलेल्या मोकळया जागेतुन कोणीतरी अज्ञात चोरटयानी आंतमध्ये प्रवेश करून,एक चंदनाचे झाडाचा बुंधा ९५,०००/- रुपये किंचे कशाचेतरी सहाय्याने कापुन चोरी करुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, व्हि.व्हि.जगताप ९६२३००८४१४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**